# प्रतिज्ञापत्र नमूना
## (नवीन उद्योगधंदा / व्यवसाय / साठा परवान्यासाठी)

मी श्री.---------------------------------------------------- वय – वर्षे रा. ------------------- कारणे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील / पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील ----------------------------------------------------------------- मध्ये ---------------------------------------- हा उद्योगधंदा / व्यवसाय / साठा व्यवसाय सुरू करणार आहे / सुरू आहे व त्याचे क्षेत्रफळ --------------------------- चौ.फुट एवढे आहे व कामगार संख्या -------- ------------------- इतकी आहे व उद्योगासाठी ------------------ एच.पी. ची आवश्यकता आहे.

वरील ठिकाण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवासी विभागामध्ये / पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रात आहे. त्यामुळे सदर जागेवर तात्पुरत्या स्वरूपाचा उद्योगधंदा / व्यवसाय / साठा परवाना सुरू करणेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने खालील अटींवर परवाना देण्याचे मान्य केले आहे.

१. सदरचा परवाना हा तात्पुरता स्वरूपाचा असल्याने तो कारण न देता केव्हाही रद्द करणेचा अधिकार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राहील.

२. माझ्या उद्योग / व्यवसायामुळे हवा, पाणी, ध्वनी यांचे प्रदुषण होत असल्याचे आढळल्यास अथवा आजूबाजूच्या रहिवाशांची तक्रार प्राप्त झाल्यास व त्यामुळे महापालिकेने उद्योगधंदा / व्यवसाय / साठा परवाना रद्द केल्यास त्याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

३. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस / पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास ज्यावेळी विकासाकरीता / रस्ता रूंदीकरणाकरता / इतर आवश्यक कारणाकरीता सदरची जागा मोकळी करून हवी असल्यास मी स्वखुषीने ती खाली करून देईन व त्याबद्दल पर्यायी जागेची मागणी करणार नाही.

४. सदर उद्योगधंद्याच्या मुळ स्वरूपाबद्दल अथवा विस्तार करणेपूर्वी मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेईन व तसे न केल्यास सदरचा परवाना हा कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करणेचा अधिकार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राहील.

५. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदरचा परवाना रद्द केल्यास मनपाकडून / प्राधिकरणाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणार नाही.

६. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोणत्याही कारणास्तव सदरचा परवाना रद्द केल्यास त्याविरूध्द न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार मला राहणार नाही.

७. उद्योगधंदा परवाना मिळण्यासाठी मी दिलेली सर्व माहिती अचूक व बिनचूक आहे. सदरील माहिती तपासणी अंती असत्य व खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहिता कलम १९३ व १९९ प्रमाणे गुन्हा होऊ शकतो व सदर गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त ७ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते याची मला जाणीव असून मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

वरील सर्व अटी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत, त्याबद्दल माझी कसलीही तक्रार नाही. आज दि.    /    /२०     रोजी मी खाली सह्या करणा-या दोन साक्षीदारांसमोर सदरचे प्रतिज्ञापत्र लिहून दिले असून त्यावर स्वखुशीने स्वाक्षरी केली आहे.

साक्षीदार :-

१) नाव :
पत्ता :
सही :

प्रतिज्ञापत्र करणार :
नाव :

सही :

२) नाव :
पत्ता :
सही :

---

टिप : सदरचे प्रतिज्ञापत्र र.रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करणे.